# ज्योती

ईशान्य ओहायो मराठी मंडळ     भाद्रपद–अश्विन श. १९३३     सप्टेंबर–ऑक्टोबर २०११     NEOMM Tax ID: 341644989

## कार्यकारिणी २०११

अध्यक्ष: **संध्या देशपांडे**
president@neomm.org
उपाध्यक्ष: **शरद वानखडे**
सचिव: **ज्योती हरवाळकर**
secretary@neomm.org
कोषाध्यक्ष: **श्रीकांत लिमये**
treasurer@neomm.org
सांस्कृतिक कार्यवाह:
**पराग कानविंदे**
ज्योती संपादक:
**कौस्तुभ लेले**
editor@neomm.org
वेब मास्टर: **जुई साठे**
सहकार्य: **सुषमा वानखडे**
**गीता लिमये**
**मोहिनी खुर्द**
**विजय हरवाळकर**

विश्वस्त: **मेधा गोडबोले**
**मोहन दुर्वे**
**अशोक पाटील**

*************************

जाहिरातीचे दर
पाव पान $ 25
अर्ध पान $ 50
पूर्ण पान $ 75
दिवाळी अंकाकरता हे दर दुप्पट

*************************

## संपादकीय

सर्वप्रथम जुलै २०११ च अंक प्रकाशित न करण्याबद्दल क्षमस्व. असं आहे कीं साहित्य न मिळाल्याने रिकामा अंक काय तो निघाला असता. म्हणून उन्हाळ्याची सुट्टी घेतली. असो. या अंकात साहित्य असण्याचं श्रेय विलास देसाई यांना आहे. त्यांच्या लेखांवरून लक्षात येईल कीं लेख माहितीपूर्ण, किंवा विचारांना चालना देणारे किंवा चकाव्या स्वरूपाचेही असू शकतात. आपणा सगळ्यांकडे काहीतरी सांगण्यासारखं असतं. पण भीति असते कीं कुणाल आवडेल कीं नाही. मला आवर्जून सांगावसं वाटतं कीं ही भीति बागुलबुवासारखी असते, म्हणजे आपणच कल्पिलेली असते. सर्वांना विनन्ती आहे कीं आपला दिवाळीचा अंक छानसा करायला बाह्या सरसावून लेखण्या हाती घ्याव्यात.

जितक्या सहजपणे आपण पार्टीत गप्पा मारतो तशाच सहजपणे या लेखी माध्यमातून होऊ शकतात. फेसबुक आणि ट्विटर वरून अशा गप्पा होतातच कीं. तर मग ज्योतीद्वारां कां न व्हाव्यात? विषय प्रगल्भ असो कीं अवखळ असो.

आता याच अंकात असलेल्या अण्णा हजारेंविषयी लेखावर एक प्रतिक्रिया : मला वाटतं कीं अण्णा हजारेंच्या आंदोलनाचा सर्वोत्तम परिणाम असेल तर जनजागृती. ही जागृती भ्रष्टाचाराची केवळ जाणीव देणारी नसून सामुदायिक रीत्या त्याच्या निवारणाची ठाम मागणी जनता करू शकते आणि त्याकडे अधिकारी लोकांना काणाडोळा करून चालणार नाही अशा प्रकारची आहे. अण्णा हजारेंनी त्या निवारणाचे उपाय देण्याची गरजच नाही. ते अतिशय उघड आहेत. पण ते उपाय अंमलात आणण्यासाठी आग्रह, खराखुरा सत्याग्रह चालू आहे आणि अण्णा हजारे कोण आहेत हे माहीतही नसलेला तरुण वर्ग आखाड्यात उतरला आहे.
इतकेच पुरे. तुम्हां सर्वांकडून आता अपेक्षा आहे.

## आगामी कार्यक्रम

### ई.ओ.म.मं. चा गणेशोत्सव



**स्थळ–काळ**

**Bamboo Garden**
**North Olmsted**
**on Sunday Sept 11**

अधिक माहितीसाठी
**http://www.neomm.org/**

*********************
कोजागरी पौर्णिमा ऑक्टोबर ८
दिवाळी नोवेम्बर ५
*********************

विशेष दिवस :
ऑगस्ट १: लो. टिळक पुण्यतिथि
सप्टें. २८: नवरात्रोत्सव
ऑक्टो. २: म. गान्धी जयन्ती
ऑक्टो. ६: विजयादशमी – दसरा
ऑक्टो. २६: दिवाळी – लक्ष्मीपूजन
ऑक्टो. २७: दिवाळी – बलिप्रतिपदा

## दोन मनांतील अंतर

एकदा एका साधुने त्याच्या शिष्यांना विचारले, " आपण रागात असताना जोरात ओरडतो किंवा कोणाशी भांडण झाले असल्यास आपोआप आपला आवाज वाढतो, असेका?". सर्व शिष्य विचार करु लागले. एक शिष्याने उत्तर दीले, "रागावलेले असताना आपण स्वतःवरचे नियंत्रण हरवुन बसतो, आणि म्हणुनच कदाचीत ओरडून बोलतो."

यावर साधुमहाराज म्हणाले, " पण ज्या व्यक्तीवर आपण रागावलेले असतो ती समोरच असते तरी सुध्दा आपण ओरडतो।जरी सौम्य आणि मृदु आवाजात बोलणे शक्य असले तरी देखील रागात आपण चढ्या आवाजातच बोलतो". यावर सर्व शिष्यांनी विचार केला आणि आपापल्या परीने उत्तर देण्याचा प्रयत्न केला, मात्र कोणत्याच उत्तराने साधुचे समाधान झाले नाही. शेवटी साधुमहाराजांनी स्वतःच उत्तर दीले. ते म्हणाले, " जेव्हा दोन व्यक्ती एकमेकांवर रागावलेल्या असतात तेव्हा त्यांच्या मनांमध्ये अंतर वाढलेले असते आणि हेच अंतर भरुन काढण्याकरीता ते चढया आवाजात बोलतात."

"आता मला सांगा की जेव्हा दोन व्यक्ती परस्परांच्या प्रेमात असतात तेव्हा अतीशय हळू आणि शांतपणे बोलतात, असे का?" असा प्रश्न विचारुन मग स्वतःच उत्तर देत ते म्हणाले," कारण त्यांची मनं जवळ आलेली असतात. दोन मनांतील अंतर कमी झालेले असते.

आणि जसजसे दोन व्यक्ती मधील प्रेम वाढु लागते तसतसे त्यांच्यातील संवाद इतका सुलभ होउन जातो की सर्वच गोष्टी बोलण्याची देखील आवश्यकताच भासत नाही. फक्त नजरेतुनच किंवा देहबोलीतुनच ते आपल्या साथीदाराला काय म्हणायचे आहे ते ओळखतात.

शिकवण- परस्परांत वाद विवाद आणि भांडण तंटे होतच राहतात मात्र कीतीही वादविवाद असला तरी मनामनातील अंतर वाढु देउ नका।तसे होउ दील्यास दोन व्यक्तींमधील दरी इतकी मोठी होइल की पुन्हा ती मिटवणे कधीच शक्य होणार नाही.

– मोहिनी खुर्द

## वंदे मातरम् ॥

मी १४ औगस्ट रोजी फायकाच्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमास गेलो होतो. तेव्हा तिकडे वंदे मातरम् हे राष्ट्रभक्तिपर गीत गाण्यात आले.

श्री बंकिमचंद्र चतर्जी ह्यांच्या आनंदमठ ह्या कादंबरीतील हे गीत, हेच आपल राष्ट्रगीत होणार होत. परंतु मौलान शौकत अली आणि महंमद अली ह्या बंधूनी हरकत आणल्यामुळे मुस्लीमधार्जिणे पंतप्रधान आणि त्यांच्या कॉंग्रेस पक्षाने हे गीत नुसतच काढल नाही तर त्याची पुढची कडवी सुध्दा गाळली. तरी नशीब कि लेडी माउंट्बेटननी हरकत घेतली नाही अन्यथा ह्या गाण्यावर आणि पर्यायी आनंदमठ चित्रपटावर सुध्दा बंदी आली असती. तरी हे संपूर्ण गीत लोकांना कळाव म्हणून लिहीत आहे.

वंदे मातरम् ॥
सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलाम् ।
शस्य–शामलाम् मातरम् ॥ वन्दे मातरम् ॥
शुभ्र–ज्योत्स्ना–पुलकित–यामिनीम् ।
फुल्ल–कुसुमित–द्रुमदल–शोभिनीम् ।
सुहासिनीम् सुमधुर–भाषिणीम् ।
सुखदाम् वरदाम् मातरम् ॥ वंदे मातरम् ॥
कोटि–कोटि–कंठ–कलकल–निनाद–कराले ।
कोटि–कोटि–भुजैर्धृत–खरधरवाले ।
के बले मा तुमि अबले ।
बहुबल–धारिणीम् नमामि तारिणीम् ।
रिपुदल–वारिणीम् मातरम् ॥ वंदे मातरम् ॥
तुमि विद्या तुमि धर्म । तुमि हृदि तुमि मर्म ॥
त्वंहि प्राणः शरीरे । बाहू ते तुमि मा शक्ति ।
हृदये तुमि मा भक्ति ।
तोमारई प्रतिमा गडि मंदिरे मंदिरे मातरम् ॥
वंदे मातरम् ॥
त्वंहि दुर्गा दशप्रहरणधारिणी । कमला
कमलदलविहारिणी ॥
वाणी विद्यादायिनी नमामि त्वां नमामि कमलाम् अमलाम्
अतुलाम् सुजलाम् सुफलाम् मातरम् ॥
वंदे मातरम् ॥
श्यामलाम् सरालाम् सुस्मिताम् भूषिताम् धरणीम् भरणीम्
मातरम् ॥
वंदे मातरम् ॥

– विलास देसाई

# अण्णा हजारे आणि लोकपाल बिल

अण्णा हजारे आणि लोकपाल बिल

सध्या भारतात जे देशव्यापी आंदोलन भ्रष्टाचारा विरुध्द चालल आहे, त्या आंदोलनाचे पुरस्कर्ते श्री अण्णा हजारे आहेत हे सर्वश्रुत आहे.

अण्णांच जनलोकपाल बिला बद्दल माहीती देण वैगेरे ह्याचा विचार मांडला तर हा लेख फारच मोठा होईल आणि जागे अभावी आणि विषयांतर होण्यापेक्षा सरळ आपण मूळ मुद्याकडे वळू.

अण्णांचा हा उपक्रम फारच स्तुत्य आहे, आणि इतर देशांप्रमाणे अण्णांनी हा मुद्दा हिंसात्मक पद्धतीने न घेता,भारताच्या १९२० नंतरच्या म्हणजेच महात्मा गांधी हे जेव्हा राजकारणात सक्रिय झालेत तेव्हा पासुन जो मार्ग भारतीय संस्कृतीत भिनला आहे , त्यापैकी अहिंसा आणि उपोषण ह्या मार्गांचा अवलंब केला आहे.

हा उपक्रम फारच स्तुत्य आहे. परंतु हाच अंतिम तोडगा आहे का? किंवा हा यशाचा मार्ग आहे का?

स्वतः महात्मा गांधी ह्या मार्गाने यशस्वी झालेत का? जर उत्तर होय असेल तर मग त्यांच्याच पक्षात देशद्रोही आणि भ्रष्टाचारी का आहेत?

जर हा मार्ग यशाचा असता तर देशाची फ़ाळणी झाली नसती, डोमेनियन स्टेटस भारताला मान्य करावा लागला नसता.

ह्याच तत्त्वांमुळे जनता स्वस्थ बसली आणि सहिष्णुता वैगेरे मुळे भारत देश आज इतक्या खाईत गेला.

आता मूळ मुद्याकडे वळू. हे मानू आपण की अण्णा आणि त्यांची टिम ही सर्व तरेने साफ आहे, परंतु इतर सर्व जे अण्णांच्या पाठीशी उभे आहेत ते किती स्वच्छ आहेत? काय त्यांनी स्वखुशीने किंवा मजबूरीने म्हणा कधीच भ्रष्टाचार केला नाही? का आता सर्व करुन स्वतःची प्रतिमा जनमानसात चांगली करु पहात आहेत? कीं अण्णांना पाठींबा दर्शविला कि आपला भ्रष्टाचार लपला जाईल असे त्यांना वाटते?

आज भारतात शिक्षणा सारख्या पवित्र क्षेत्रा पासून ते अगदी सर्व क्षेत्रांमध्ये भ्रष्टाचार पसरला आहे. तेव्हा हे लोकपाल बिल किती जणांना अडवाणार?

त्यापेक्षा जर अण्णांना जर खरच भ्रष्टाचार संपवायचा असेल तर त्यांनी हा मार्ग अवलंबण्यापेक्षा सरळ निष्पक्षपाती पणे स्वःताचा पक्ष काढावा आणि त्यात त्यांची टिम आणि इतर राजकारणातील मंडळी जी भ्रष्ट पक्षात राहून सुद्धा भ्रष्ट नाहीत अशांना त्यांची निपक्षपातीपणे पार्श्वभूमी पडताळून पक्षात प्रवेश द्यावा, त्यांना कुठ्ल्याही प्रकारच मधाच बोट लावु नये आणि स्वतः निवडणुक लढवावी.

सत्तेवर येताक्षणी भारताची राज्यघटना आणि कायदे जे ईंग्रज काळापासुन चालत आले आहेत (गोवा,दिव,दमण,दादरा,नगरहवेली येथील पोर्तुगिज कायदे, आणि पोन्डेचरीचे फ्रेंच कायदे) बदलावेत आणि एक समान नागरी कायदा करावा.

धर्म, जात,रित रिवाज ह्यांना दुय्यम स्थान द्यावे आणि सामाजिक रुढी बदलाव्यात.

सर्व राज्यसभा बरखास्त कराव्यात आणि प्रत्येक राज्यावर एक सनदी अधिकारी नेमावा, आणि जर त्या राज्यात काहीही गडबड झाली तर त्याची जबाबदारी त्या अधिकार्यावर ठेवावी आणि त्याला कडक शासन कराव.

लष्कर, पोलीस आणि सुरक्षादलाला जरी जास्त अधिकार दिलेत तरीहि त्यांच्यावर केंद्र सरकारचा वचक असावा. जेणेकरुन निर्दोष त्रासले जाणार नाहीत.

केंन्द्र हिच अंतिम सत्ता ठेवावी, आणि सर्व भारत हा केंद्रशाषित करावा.

हे मी माझ मत मांडत आहे, ह्या वर तुमच मत जरुर मांडाव.

**– विलास देसाई**

# कॉलेज कट्टा

## सर्वात श्रेष्ठ मराठी नर्तकी

सुट्टी होती काही उद्योग नव्हता म्हटल चला कुठ्चातरी पिक्चर बघू. सर्व सन्ग्रह शोधला आणि **पिन्जरा** सापडला व्हि. शान्तारामानचा. पटेल ब्रदर्स कडून आणलेल्या चितळे बदर्सच्या बाकरवडीचा आस्वाद घेत पिन्जरा पाहू लागलो. त्यातील सन्ध्याबाईंच नृत्यकौशल्य पहाता अचानक गरम चहाचे घुटके घेताघेता मन भूतकाळात गेल. त्या भूतकाळातील आठवणी , तो कालेजाचा कट्टा, तिथून नंतर जवळच असलेल्या जनता होटेल मध्ये जाण आणि असाच बाकरवडीवर ताव मारत किंवा (तो हक्क फक्त आमचाच होता, इतर गिऱ्हाईकाना ती सोय नव्हती) त्याच्या पोरयाला ए*** चल जरा मधु वडापाववाल्या कडून वडापाव आण किंवा गरमागरम भजी आण अशी आमची ऑर्डर असायची(*** प्रेमाने म्हणायच आणि त्यालाही हे माहीत होत.) आणि मग एकदा का हा अल्पोपहार पार पडला की मग कुणी आपल्या फुंकण्या काढल्या तर कुणी जर्दे आणि मग गप्पाष्टक चालू. घसरत घसरत विषय हमखास सिनेमावर यायचा. कुणी आज कुणता नवा सिनेमा पाहिला. त्यावेळी नगिना हा श्रीदेवीचा पिक्चर अप्सरा थिएटरला लागला होता, आमच्यातील सर्व श्रीदेवीच्या चाहत्यानी हा सिनेमा पाहिला होता. सर्वजण तिच्या नागनृत्याची तारीफ़ करण्यात गुंग झाले होते. मग मकसद मधील जयाप्रदा आणि श्रीदेवीच नागनृत्य मग दोघात कोण सरस नाचली ह्या चर्चाना उत आला. मी आपला चुपच होतो म्हटल बोलून देउ ह्याना मग माझी तोफ डागतो. बरोबर काळेची नजर माझ्यावर पडली, म्हणाला
ए लेका तू गप्प का नेहमी फिल्म इन्डस्ट्रीवर तावातावने बोलणारा तू आज तुझ्या जिभेला काय झाल? झुरका मारायाचा आहे का जास्त? ए काढ रे ती नवी फ़ुन्कणी काढ.
नाही यार तस नाही मी म्हाणालो.
मग काय ? मग तु असा गप्प का? पंडीतने विचारल.
नाही रे तुम्ही समजणार नाही मी म्हणालो.
मग सांग ना तु.
अरे ***नो आपल्या महाराष्ट्रात ह्या सर्व दक्षिणात्य नाचणाऱ्यांअपेक्षा एकच आहे पण सुन्दर नर्तकी आहे.
कोण? – सर्व म्हणले.
संध्याबाई.
कोण?
संध्याबाई – मी पुन्हा म्हण्टल.
काय सांगतोस?
खर तेच सांगतो मी म्हण्टल. तुम्ही सर्वानी जलबीन मछली नृत्यबीन बिजली पाहीला आहे का? नाही, मग पहा , खरा नागनाच सन्ध्याबाईनी त्या सिनेमा मध्ये मोरांच्या मध्ये जो नागिणी प्रमाणे सरपटुन केला आहे ना तो तुमच्या त्या वैजयंतीमालाबाली पासुन ते अगदी कालपरवा जन्मलेल्या श्रीदेवीच्यासुध्दा नशीबात नाही. त्यासर्वजणीना सात जन्म घ्यावे लागतील असा नाच करायला. आपण अशी ही आपल्या महाराष्ट्रातील रत्ने विसरुन परकीय रत्नांची कौतुक करतो आहोत आणि म्हणूनच महारष्ट्र मागे पडला आहे मी म्हण्टल. जाउंदे रे बाबा ह्याच सगळ वेगळ काळे म्हणला. हा ना अजुनही जुन्या जमान्यातच आहे.
मी म्हंटल पहा तो पिक्चर आणि मग मला सांगा जुने ते सोने की नाही ते.
पाहू पाहु आम्ही आणि पुढच्या बैठकीला याविषयावर बोलू.
भूतकाळातून वर्तमानात आलो तोच पिक्चर संपल्याच ध्यानात आल्यावर. तोपर्यन्त चहाचा शेवटचा घुटका सुध्दा संपला होता.

**– विलास देसाई**

**– विलास देसाई**

If undelivered, please return to:
Kaustubh Lele
6293 Coldstream Drive
Highland Heights, OH 44143

To,